# प्रभूने आपल्या लोकांना शिकविण्यासाठी यशयाला तयार केले

## यशया संदेष्ट्याने स्वर्ग पाहिला होता

**प्रार्थना** ''प्रिय प्रभू, यशया संदेष्ट्याने तुझे वैभव व पवित्र्य पाहिले, तसे आम्हाला पाहू दे आणि त्याच्या प्रमाणेच आम्हाला तुझ्यासमोर नम्र कर तू करीत असलेले शुद्धीकरण स्वीकारून तुझी सेवा करावी असे कर.''

मुलांचे वय आणि गरजांनुसार शिकविण्याचे कार्यक्रम निवडा.

देवाने यशयाला स्वर्गाचे दर्शन घडविले आणि मग त्याला प्राचीन इस्राएल लोकांना देवाचे वचन शिकविण्यास पाठविले हा यशया 6:1-8 मधील वृत्तांत वाचा किंवा सांगा.

पुढील प्रश्न विचारा (उत्तरे प्रत्येक प्रश्नापुढे दिली आहेत)

- यशयाला प्रभू कोठे दिसला? (पाहा वचन 1)
- प्रभूच्या वरून काय उडत गेले? (वचन 3 सराफीम दिव्य देवदूत होते)
- सराफीम काय घोषणा देत होते? (वचन 3)
- देवदूतांच्या वाणी नंतर मंदिराचे काय घडले? (वचन 4)
- हे घडल्यावर यशयाला काय वाटले? (वचन 5)



- यशयाला भीती का वाटली? (वचन 5)
- यशयाचे ओठ शुद्ध कसे झाले? (वचन 6-7)
- यशयाला देवदूताने काय सांगितले? (वचन 7)
- प्रभूचा कोणता प्रश्न यशयाला ऐकायला आला? (वचन 8)
- यशयाला काय उत्तर दिया? (वचन 8)
- आम्हाला देखील देवाने यशयाप्रमाणे शुद्ध करण्याची आणि आमच्या पातकांची क्षमा करण्याची आवश्यकता आहे का?
- समजा लोकांना देवाबद्दल सांगायला कोणाला पाठवू असे देवाने विचारले तर आम्ही काय उत्तर द्यावे?

प्रभूने देवाचे वचन शिकविण्यासाठी यशयाला कसे तयार केले या वृत्तांताचे नाट्यीकरण करा (यशया 6:1-8).

- मुलांना ही छोटी नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.
- शिकविण्याचा वेळेचा उपयोग मुलांकडून नाटिकेची तयारी करून घेण्यासाठी करा.
- तुम्ही सर्व भाग केलेच पाहिजेत असे नाही.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांच्या तयारी साठी मदत करावी.
- मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी यशया, देवाची वाणी आणि निवेदक ह्या भूमिका करण्यात निवेदकाने सारांश तयार करून मुलांकडून संवाद पाठ करून घ्या.
- लहान मुलांनी सराफीम (दिव्य देवदूत) ह्या भूमिका कराव्यात त्यांनी कोळश्याच्या निखाऱ्यासारखे काही तरी मिळवावे.

**भाग 1**

**निवेदक:** यशया 6:1-7 मधून वृत्तांत्ताचा पहिला भाग सांगून म्हणा, ''यशया काय म्हणतो ते ऐका''

**यशया:** तुमचे हात डोळ्यांवर ठेवून मोठ्याने म्हणा,

''मी प्रभूला त्याच्या मंदिरात पाहिले! त्याचे गौरव सर्वत्र पसरले होते! त्याच्या सिंहासनाभोवती देवदूत उडत होते!

मंदिर हालत होते आणि ते धुराने भरून गेले होते!

मी फार घाबरून गेलो कारण मी पातकी आहे!''

**निवेदक:** ''दिव्य देवदूत काय गातात ते ऐका.''

**सराफीम** (मुले) मोठ्याने गा किंवा म्हणा, ''पवित्र, पवित्र पवित्र, सेनाधीश परमेश्वर!''

**सराफीम** (मुली) ''अखिल पृथ्वीची समृद्धी त्याचे वैभव होय!''

तुम्हाला मुलांकडून देवाच्या पवित्रपणाचे वर्णन करणाऱ्या गीताची तयारी करून घेता येईल.

**यशया:** ''प्रभू, मी अशुद्ध आहे! माझे सर्व लोक पापी आहेत मी तुझ्या समोर उभे राहण्यास अपात्र आहे!''

**सराफीम देवदूतांपैकी एक:** यशयाकडे निखारा घेऊन मोठ्याने म्हणा, ''देवाने तुला क्षमा केली आहे. त्याने तुझे दोष काढून टाकले आहेत. आता सर्व शुद्ध झाले आहे!''

**भाग 2**

**निवेदक:** वचन 8 मधून वृत्तांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''प्रभू काय म्हणतो ते ऐका.''

**देवाची वाणी:** मला एका संदेष्ट्याची गरज आहे. लोकांना शिकवायला कोण जाईल?''

**यशया:** ''हा मी आहे, मला पाठीव!''

**निवेदक:** नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न:** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर वर दिलेले प्रश्न त्यांनी मोठ्या माणसांना विचारावेत.

**प्रात्यक्षिक:** पेन्सिल कागद आणि काडीपेटी तयार ठेवा मुलांना विचारा:

- देवासमोर आम्हाला कोणत्या गोष्टी अशुद्ध ठरवतात? मुलांनी सांगितलेल्या गोष्टी कागदावर लिहून घ्या.
- आपल्या पातकापासून आपली सुटका कशी होते? कागद जाळून टाका देव आमची पातके दूर करतो हे स्पष्ट करा.

**विचारा:** सराफीम देवदूत स्वर्गामध्ये देवाची पवित्रता व वैभवाची स्तुती करणारी गीते गातात, तशाच वर्णनाची कोणती गीते आम्ही गातो? (मुलांनी काही सांगून ती गाऊन दाखवावी)

**चित्र** काढा. जळता निखारा मुलांनी हे चित्र उपासनेच्या वेळी मोठ्या माणसांना दाखवून देव शुद्ध व पवित्र आहे आणि अग्नी सोन्याला शुद्ध करतो, तसे तो आम्हाला शुद्ध करतो हे समजावून सांगा.



**पाठ करा** स्तोत्र 51:10

**कविता** तीन मुलांना स्तोत्र 63:1-3 मधून प्रत्येकी एक वचन म्हणायला सांगा.

हे देवा तू माझा देव आहेस,
मी आस्थेने तुझा शोध करीन
शुष्क रूक्ष व निर्जल प्रदेशात माझा जीव
तुझ्यासाठी तान्हेला झाला आहे,
माझ्या देहालाही तुझी उत्कंठा लागली आहे.
अशा प्रकारे तुझे बळ व वैभव पाहण्यास
पवित्रस्थानी मी तुझ्याकडे दृष्टी लाविली आहे.
तुझे वात्सल्य जीवनाहून उत्तम आहे,
माझे ओठ तुझे स्तवन करीतील.

देवाच्या पवित्रपणाविषयी वर्णन असणारे गीत, कविता किंवा साधी नाटिका मोठ्या मुलांना लिहिण्यास सांगा. ते स्वर्गातील दिव्य देवदूत देवाची स्तुती कशी करतात आणि आम्हाला त्याची सेवा करता यावी म्हणून तो आम्हाला कसे शुद्ध करतो याचे वर्णन करतील.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, यशयाप्रमाणे आम्हीही तुझी पवित्रता आणि तुझ्या वैभवाची स्तुती करतो. दिव्य देवदूत तुझी उपासना करतात. त्यांच्या सुरात सूर मिसळून आम्हीही गातो,'' पवित्र! पवित्र! ''आम्ही किती अशुद्ध अस्वच्छ आहोत हे तुझी पवित्रता पाहून आम्हाला समजते. आम्हाला क्षमा कर आणि शुद्ध कर. येशूच्या नावात आभार मानतो.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net